# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल च्या विविध पास योजनांना प्रवाशांची पसंती

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील मध्यवर्ती पास विभागामार्फत पुणे व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील व हद्दी बाहेरील एकूण ५७ पास केंद्रांवरून विविध प्रकारचे एकूण १० प्रकारचे पास विक्री केले जातात. या १० प्रकारामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांकरीता ५ प्रकारचे सवलतीचे पास दिले जातात. तसेच ज्येष्ठ नागरीक सवलतीचा १ प्रकारचा मासिक पास, जनरल प्रवाशी मासिक पास ४ प्रकारचे इ. प्रकारचे पास पीएमपीएमएल च्या पास विभागामार्फत वितरीत केले जातात.

त्या अनुषंगाने पीएमपीएमएल च्या मध्यवर्ती पास विभागामार्फत माहे जुलै २०२२ व जुलै २०२३ मध्ये करणेत आलेल्या पासेस विक्रीचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | पासेस प्रकार | जुलै २०२२ पास खप संख्या | जुलै २०२२ उत्पन्न रक्कम रूपये | जुलै २०२३ पास खप संख्या | जुलै २०२३ उत्पन्न रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण विद्यार्थी पासेस पोटी आलेले उत्पन्न | १३३१४ | ९६,९४,२५० | १७५८५ | १,६९,८३,८०० |
| २ | ज्येष्ठ नागरीक पासेस पोटी आलेले उत्पन्न | ५६२४ | २८,१२,००० | ७२९२ | ३६,४६,००० |
| ३ | जनरल प्रवाशी पासेस पोटी आलेले उत्पन्न | १६९५० | १,४३,७०,९०० | २३४३० | १,९५,५४,५१० |
| ४ | पुणे व पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी पासेस पोटी आलेले उत्पन्न | १००४ | ७,०२,८०० | १००१ | ७,००,७०० |
| ५ | पुणे मनपा हद्दीतील इयत्ता ५ वी ते १० वी तील खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना मनपा धोरणानुसार ७५ टक्के सवलतीचा वार्षिक पास व मनपा शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी तील विद्यार्थ्यांना १०० टक्के सवलतीचा वार्षिक पास. | ७१७२ | | ८३३२ | |
| ६ | पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील इयत्ता ५ वी ते १० वी तील खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना मनपा धोरणानुसार ७५ टक्के सवलतीचा वार्षिक पास व मनपा शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी तील विद्यार्थ्यांना १०० टक्के सवलतीचा वार्षिक पास. | १७८१ | | ३५०० | |
| | एकूण | ३६८९२ | २,७५,७९,९५० | ४९३०८ | ४,०८,८५,०१० |

माहे जुलै २०२२ चे अवलोकन केले असता जुलै २०२३ मध्ये प्रवाशी संख्येमध्ये १३४१६ व उत्पन्नात रूपये १,३३,०५,०६०/- इतकी वाढ झालेली आहे. तसेच पुणे व पिंपरी चिंचवड मनपाचे ७५ टक्के व १०० टक्के सवलतीचे पासेस संख्येमध्ये एकूण २८७९ इतकी वाढ झालेचे दिसून येत आहे.

तरी इतर शाळा व कॉलेजच्या राहिलेल्या विद्यार्थ्यांनी वरील सवलतीच्या पासेसचा लाभ घ्यावा असे आवाहन महामंडळामार्फत करणेत येत आहे.

**sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. ०७/०८/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

**sd/-**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---